दिशादर्शक,मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

facebook page /Diwanews

**ठाण्यात कचऱ्यापासून बनणार खत ;१० ठिकाणी उभे राहणार खत निर्मिती प्रकल्प**

(पान.५ वाचा)

वर्ष-१ ♦ अंक - ४९ ♦ सोमवार,११ जुलै २०२२ ♦ पाने-८ ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्यात शिवसेनेला धक्का,शहरप्रमुख, उपशहर प्रमुख यांसह विभाग प्रमुख व माजी नगरसेवक शिंदे गटात सहभागी !

**दिवा:**-एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर ठाणे जिल्ह्यात शिवसेनेला ठिकठिकाणी धक्का बसत असून दिवा शहरात शिवसेनेत मोठी पडझड झाली आहे. शहरातील आठही माजी नगरसेवक शिंदे गटात सहभागी झाले असून शहरप्रमुख, उपशहर प्रमुख व अन्य पदाधिकारी देखील शिंदे गटात सहभागी झाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सहभागी झालेल्या लोकांनी याआधीच आपणच खरी शिवसेना असल्याचे म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांच्याकडे येण्र्या माजी नगरसेवकांची संख्या अधिक असून अनेक पदाधिकारी देखील शिंदे गटात सहभागी होत आहेत.बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार घेऊन भाजपसोबत सत्तेत सहभागी झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बंडादरम्यान आणि त्या नंतर मोठ्या प्रमाणात समर्थकांची रीघ शिंदे यांच्या गटाकडे लागलेली आहे. त्यातच बुधवारी रात्री ठाण्यातील ६६ माजी नगरसेवकांनी माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली 'नंदनवन' या निवासस्थानावर भेट घेत, त्या सर्वांनी शिंदे यांच्या गटात जाहीर रित्या प्रवेश केला. यामध्ये दिव्यातील नगरसेवकांचाही सहभाग होता.यामध्ये तीन माजी महापौर, दोन माजी उपमहापौर , माजी स्थायी समिती सभापती, इतर समितीचे सभापती तसेच माजी ज्येष्ठ नगरसेवक देवराम भोईर यांचा समावेश आहे. परंतु, बुधवारी लोकसभेच्या प्रतोदपदी नियुक्ती झालेल्या ठाण्याचे खासदार राजन विचारे यांच्या पत्नी व माजी नगरसेविका नंदिनी विचारे यांचा त्या ६६ माजी नगरसेवकांमध्ये समावेश नाही. तसेच त्या व्हायरल झालेल्या छायाचित्रांमध्ये दिसतही नाहीत.



# सर्व्हिस रोड अडविणाऱ्यांवर यापुढे कारवाई; महापालिकेचा निर्णय

*सर्व्हिस रोड अडविणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले. ही कारवाई करताना प्रभाग समिती साहाय्यक आयुक्तांनी पोलिसांशी समन्वय साधावा.*

**- संजय हेरवाडे,**
**अतिरिक्त आयुक्त ,ठामपा.**

**ठाणे :** पावसाळा आल्यावर इतर प्राधिकरणांच्या रस्त्यावर पडण्र्या खड्ड्यांमुळे वाहतुक कोंडीचे चित्र ठाणे शहरात नेहमीच पाहण्यास मिळते. मात्र त्या कोंडीत, शहरातील सर्व्हिस रस्त्यांवर पार्क होणारे वाहने असो या बिनधास्तपणे रस्त्यावर गॅरेजेस थाटणारे गॅरेज वाले असो. त्यांच्याकडे आता महापालिका प्रशासनाने लक्षवेधून कारवाईचे फर्मान काढले. ही कारवाई करताना प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांनी पोलिसांशी समन्वय साधावे असेही आदेश महापालिका प्रशासनाने दिले आहेत.

ठाणे महापालिकेने लाखो रुपये खर्च करून शहरातील विविध भागात फुटपाथ बांधले आहेत. तसेच सेवा रस्ते छोट्या मोठ्या वाहनांसाठी सुरु केले आहेत. परंतु शहरात आजच्या घडीला अनेक ठिकाणी दुचाकीचे गॅरेजवाले, जुन्या गाड्यांची विक्री करण्र्यांनी गिळंकृत केले आहेत. त्यातही शहरात पडलेले खड्डे आणि मेट्रोची कामे सुरु आहेत. त्यामुळे आधीच वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरीक हैराण झाले आहेत. त्यात पालिकेने बांधलेल्या फुटपाथवर, सर्व्हिस रस्त्यांवर या दुचाकीवाल्यानी आपली गॅरेज थाटली आहेत. तिथेच गाड्यांची बिनधास्तपणे दुरुस्ती केली जात आहे.

तीनहात नाक्यापासून ते घोडबंदर पर्यंत असलेल्या सर्व्हिस रस्त्याच्या दुतर्फा वाहने पार्क केलेली दिसतात. तसेच येथे वाहनांचे शोरुम असून त्यांच्याकडील नवी, जुनी वाहने देखील याच ठिकाणी पार्क केलेली दिसतात. परंतु आता मागील चार दिवस सुरु असलेल्या वाहतुक कोंडीचा फटका देखील या सेवा रस्त्यांना बसल्याचे दिसून आले. छोटी, मोठी वाहने ही हायवेवरील कोंडी टाळण्यासाठी या रस्त्यांचा वापर करत होते. मात्र दुतर्फा लागलेल्या वाहनांमुळे या सर्व्हिस रस्त्यांवर देखील वाहतुक कोंडी झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे किमान सर्व्हिस रस्ते तरी वाहतुकीसाठी मोकळे ठेवा अशी माफक ठाणेकर आणि वाहन चालकांनी केली आहे.

दरम्यान ठाणे महापालिकेने काही वर्षापूर्वी सर्व्हिस रस्ते मोकळे करण्यासाठी पावले उचलली होती. वाहतुक पोलिसांना मदतीला घेऊन हे सर्व्हिस रस्ते मोकळे करण्यात आले होते. परंतु पुन्हा हे रस्ते व्यापले गेल्याने महापालिकेने कठोर पावले उचलली आहेत. त्यानुसार येथील सर्व्हिस रस्ते, फुटपाथ अडविण्र्यांवर तत्काळ कारवाई करण्याचे आदेश काढल्याने कोंडीतून ठाणेकर नागरिकांची सुटका होईल अशी आशा करण्यास काही हरकत नाही.

दिशादर्शक,मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार,११ जुलै २०२२


# ‘मुख्यमंत्री दालनात आमचे दिघेसाहेब’



वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या हिंदुत्वाच्या विचारांना जनसेवेचा वसा पुढे घेऊन जाणारे कट्टर शिवसैनिक मा. एकनाथजी शिंदे साहेब महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. एक सामान्य शिवसैनिक मुख्यमंत्री होण्याचे बाळासाहेबांचे जे स्वप्न होते ते एकनाथ शिंदेच्या रुपाने पुर्ण झाले, त्याचवेळी तमाम शिवसैनिक आणि आनंद दिघे साहेबांच्या सैनिकांचा ऊर भरुन यावा असा क्षण आज तमाम महाराष्ट्राने पाहिला. पहिल्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या दालनात वंदनीय धर्मवीर आनंद दिघेसाहेबांचा फोटो लागला. आम्हाला तर वाटत होते की मा. एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी उभे राहुन दिघे साहेब आशिर्वादच देत आहेत असा हा क्षण होता. धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या या प्रतिमेमुळे मुख्यमंत्री दालनात जणू आमचे ठाणेच विराजमान झाले आहे, याचा सार्थ अभिमान माझ्यासारख्या शिवसैनिकालाच नव्हेतर तमाम ठाणेकरांना आहे.

महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून मुंबई - ठाण्यात पोट भरण्यासाठी आलेल्या गरीब कुटुंबातील आमच्या सारखी तरुण पोरं कॉलेज जीवनापासून दोन माणसांच्या विचारांनी झपाटून गेली. त्यातील एक नाव होते वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे तर दुसरे नाव होते धर्मवीर आनंद दिघे !अन्याया विरोधात लढायला हवे, आपण अन्याय सहन करायचा नाही. आपले मराठीपण या मुंबईच्या गर्दीत मागे पडता कामा नये. मुंबईसह ठाण्यात मराठी माणसाला ताठ मानेने जगता आले पाहिजे, या विचारांनी आम्ही झपाटून गेलो. आपल्याला काय व्हायचे आहे, कुठे जायचे आहे, राजकारण कशाशी खातात आणि कसे जगतात यापैकी काहीही माहिती नव्हते, पण अंगात रग होती. दिघे साहेबांनी आदेश दिले की कामाला लागायचे. लोकांसाठी संघर्ष करायचा.. या भावनेतून ठाण्यातून माझ्यासारखे अनेक तरुण दिघे साहेबांच्या पाठीशी उभे राहिले. दिघे साहेबांनी शिवसेना वाढवायला सुरुवात केली. संघटना आक्रमक भूमिका घेऊन काम करू लागली. या काळात एकनाथ शिंदे, मी आणि असंख्य शिवसैनिक उभे राहिले. घरची परिस्थिती बेताची, कुणाची वाईट तर कुणाची तर रोजीरोटीची रोजची लढाई. कोण रिक्षा चालवायचा, कोण वडापावची गाडी चालवायचा, कोण कुठे तरी छोटी - मोठी नोकरी करायचा, पण दिघेसाहेंबानी हाक दिली की, हातातील सगळी कामे बाजूला टाकून त्यांच्या पाठीशी लाखो तरुण उभे राहायचे. एवढेच नव्हे, तर आपला जीव देण्यासाठी तयार व्हायचे. न्याय हक्कासाठी आंदोलने झाली, अनेक वेळा पोलीसांनी मारले, गुन्हे दाखल झाले, अटक झाली पण धर्मवीर आनंद दिघे यांचा शिवसैनिक कधीच मागे हटला नाही. दिघेसाहेब पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यातूनच आमच्या सारख्या अनेकांची करिअर उभी राहिली. कोण नगरसेवक , महापौर , आमदार झाले मंत्री आणि खासदारही झाले, पण दिघेसाहेबांचा सैनिक आजपर्यंत कधी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर बसला नाही. हे भाग्य शिवसेना प्रमुख आणि धर्मवीर आनंद दिघे यांचा कट्टर शिवसैनिक असलेल्या मा. एकनाथ शिंदे यांना लाभले.

एकनाथ शिंदे यांचा संपुर्ण प्रवास अत्यंत संघर्षाचा आहे. रिक्षा चालवणारा एक तरुण आनंद दिघे यांच्या झंझावाती कामात सहभागी होऊन आपले आयुष्य संघटनेसाठी देण्यासाठी तयार होतो, त्याला पुढे केवढे मोठे यश येऊ शकते याचे उदाहरणच नव्हेतर एक आदर्श एकनाथ शिंदे यांनी घालून दिला आहे.

दिघेसाहेबांनी जो विचार दिला, तो पुढे न्यायचा. बाळासाहेबांनी सांगितले की, ‘गर्व से कहो.. हम हिंदू आहे. दिघे साहेबांनी सांगितले कुणावर अन्याय होता कामा नये. ही विचारांची शिदोरी घेऊन शिंदे साहेब गेली अनेक वर्षे काम करीत आहेत. कोणत्याच पदाची त्यांनी अपेक्षा ठेवली नाही. आपल्या वैयक्तिक आयुष्यात जे दु:ख आले त्यालाही मागे टाकून पायाला भिंगरी लागल्यासारखे काम करणारे एक निष्ठावान सैनिक म्हणजे एकनाथ शिंदे साहेब. एक साधा कार्यकर्ता, शाखाप्रमुख, महापालिकेत नगरसेवक, सभागृहनेते, आमदार, राज्याचे विरोधी पक्ष नेते, मंत्री आणि आता राज्याचे मुख्यमंत्री एवढा प्रचंड मोठा प्रवास त्यांनी केला. यापाठीमागे त्यांचे अपार कष्ट तर आहेतच. पण दिघे साहेबांचे विचार, आशिर्वाद याचा मोठा वाटा आहे. दिघे साहेबांचे अकाली जाणे दैवालाही पटले नसावे. त्यांच्या जाण्याने खूप मोठी पोकळी निर्माण झाली, त्यांची अनेक स्वप्न अपुरी राहिली होती. त्या स्वप्नांना पुर्ण करण्याचे काम आता एकनाथ शिंदे साहेबांनी हाती घेतले आहे.

आज एकनाथ शिंदे जेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, त्यांचा तो ऐतिहासिक शपथविधी होत असताना आमचा आनंद तर गगनात मावत नव्हता. पण त्याचवेळी मनात एक सल होती ती म्हणजे हा एवढा मोठा क्षण पहायला आनंद दिघेसाहेब नाहीत. आज दिघेसाहेब जिथे कुठे असतील तिथून हे सगळे पहात असतील अशीच आमची धारणा आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रालयातील दालनात मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे विराजमान होवून राज्याचा कारभार पाहत आहेत, त्यावेळी त्या दालनात ते पाहण्यासाठी दिघे साहेब नक्की आहेत अशीच आमची धारणा आहे.

मुख्यमंत्री दालनात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटोसोबतच धर्मवीर आनंद दिघे यांचाही फोटो लावण्यात आला आहे. हा फोटो पाहून माझ्या सारख्या असंख्य दिघेप्रेमी माणसांचा ऊर भरुन आपल्याशिवाय राहणार नाही. आज मुख्यमंत्रीपदावर त्यांचा एक सैनिक विराजमान झाला, त्याच दालनात दिघे साहेबांचा वावर आहेच असे आम्ही मानतो. दिघेसाहेबांनी कधीच सत्तेच्या खुर्चीची अपेक्षा केली नाही. स्वत: एक संन्यासाप्रमाणे जगले. पण अनेकांच्या आयुष्याचे ‘नंदनवन’करून गेले. त्यांचा महाराष्ट्रात असा कधी तरी बहुमान व्हावा अशी आमची इच्छा होती .. ती आज पुर्ण झाली आहे. हे सुख आम्हाला अचानक अनपेक्षितपणे मिळाले. भाजपाचे नेते आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, तसेच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मोठे मन दाखवले. त्यांनी एकनाथ शिंदे साहेबांना जो बहुमान दिला हा बहुमान आमच्या दिघे साहेबांचा आहे. त्यांनी आयुष्यभर जो संघर्ष केला त्या संघर्षाचा आहे. हा बहुमान आमच्या ठाण्याचा ‘१००% सामान्य माणसाचा आहे. सामान्य माणसाच्या लढ्यासाठी दिघे साहेबांनी जे उभे आयुष्य खर्च केले.. त्या आयुष्याला आज ख-या अर्थाने महाराष्ट्राने ‘सलाम’ केला आहे. त्यामुळे आज मंत्रालयावर शिवसेना भाजपा युती सरकारचा भगवा झेंडा फडकतो आहे..

त्या भगव्यामध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि आमच्या दिघे साहेबांचे भगवे विचार मिसळले आहे. खरं तर दोघेही आमच्यासाठी वेगळे नाहीत. तसेच दोघांचे भगवे झेंडे ही वेगळे नाहीत. दोघांनीही आम्हाला हेच शिकवले ‘गर्व से कहो हम हिंदु है’ .. ‘जयहिंद’आणि ‘जय महाराष्ट्र’.. दिघे साहेबांची आठवण रोजच येते कारण ते आमच्या हृदयात आहेत, पण आज दिघेसाहेबांचा ठाणेकर शिवसैनिक मुख्यमंत्री झाल्याचे स्वप्न साकार झाले आहे, आज त्यांची खूपच आठवण येते.. त्यांच्यासमोर उभं राहून ’साहेब’ ‘जय महाराष्ट्र’ असे जोराने म्हणावेसे ‘जय महाराष्ट्र’..

**-नरेश म्हस्के,**
माजी महापौर ठाणे

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ.अरुणा किरण जाधव
मो.९९८७५१२००१

छायाचित्रकार/प्रतिनिधी
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने

**ऑफिस पत्ता:-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंट च्या मागे, वारेकर शाळे जवळ, गुरूदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा ( पूर्व ) , ठाणे - ४००६१२.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक -सुहास शांताराम खंडागळे** **RNI No.-MAHMAR/2021/80669**
Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhakala Print Media & Publication Pvt Ltd Plot No. W-230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai - 400710. Dist.Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Bilding,AWing,First Flr,Flat No.101,Near Sent Marry School,Diva (E),Thane-400 612 Taluka/Dist.Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale,RNI No.-MAHMAR/2021/80669**

# दिवावासीयांच्या वतीने शैलेश पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना दिल्या शुभेच्छा



दिवा:- दिव्यातील शिवसेनेचे माजी नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील आनंद आश्रम येथे सदिच्छा भेट घेतली. मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे हे ठाण्यात पहिल्यांदाच आले असता शैलेश पाटील यांनी त्यांची सदिच्छा भेट घेऊन मुख्यमंत्र्यांना दिवावासीयांच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

# मालमत्ता करातील १० टक्के सवलतीचा शेवटचा आठवडा

**ठाणे:** ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे करदाते पहिल्या सहामाही सोबत दुसऱ्या सहामाहीचा सामान्य कर एकत्रितरित्या महापालिकेकडे जमा करतील अशा करदात्यांना त्यांचे दुसऱ्या सहामाहीच्या सामान्य करामध्ये १० टक्के सवलत आहे. सदर सवलत योजनेस १५ जुलै, २०२२ पर्यंत प्रशासना ने मुदतवाढ दिली आहे. मुदतवाढीचा हा शेवटचा आठवडा असून जास्तीत जास्त करदात्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

तसेच सुटीच्या दिवशी मालमत्ता कर भरता यावा याकरीता शनिवार ०९ जुलै रोजी सकाळी १०.३० ते सायं . ५.०० वा. आणि रविवार १० जुलै रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वा. पर्यंत या कालावधीमध्ये महापालिकेच्या प्रभाग स्तरावरील कर संकलन केंद्र कार्यान्वित ठेवण्यात येत आहे. तरी या सवलतीचा नागरीकांनी / करदात्यांनी लाभ घ्यावा. महापालिकेच्या संकेतस्थळाद्वारे करदाते ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कर भरू शकतील.

# ठाण्यातून ६६ माजी नगरसेवकांनी केला शिंदे गटात प्रवेश ; तीन माजी महापौरांचा समावेश

**ठाणे:** शिवसेनेचा पहिल्यांदा झेंडा ठाणे महापालिकेवर फडकला. त्या महापालिकेत, शिवसेनेची २५ वर्षे सत्ता आहे. त्या महापालिकेतील ६७ पैकी ६६ नगरसेवकांनी सेनेतून हकालपट्टी झालेल्या माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली शिंदे यांच्या ' नंदनवन' निवासस्थानावर भेट घेत, त्या सर्वांनी शिंदे यांच्या गटात जाहीर रित्या प्रवेश केला. यामुळे शिवसेनेला अक्षरशः खिंडार पडले आहे. त्यामुळे आगामी सार्वत्रिक निवडणुकीत बाळासाहेबांचा शिवसैनिक कोणाच्या पारड्यात मत टाकणार हेच पाहावे लागणार आहे.

बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्वाचे विचार घेऊन भाजपसोबत सत्तेत सहभागी झालेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बंडादरम्यान आणि त्या नंतर मोठ्या प्रमाणात समर्थकांची रीघ शिंदे यांच्या गटाकडे लागलेली आहे. त्यातच बुधवारी रात्री ठाण्यातील ६६ माजी नगरसेवकांनी माजी महापौर नरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली 'नंदनवन' या निवासस्थानावर भेट घेत, त्या सर्वांनी शिंदे यांच्या गटात जाहीर रित्या प्रवेश केला. यामध्ये तीन माजी महापौर, दोन माजी उपमहापौर , माजी स्थायी समिती सभापती, इतर समितीचे सभापती तसेच माजी ज्येष्ठ नगरसेवक देवराम भोईर यांचा समावेश आहे.

परंतु, बुधवारी लोकसभेच्या प्रतोदपदी नियुक्ती झालेल्या ठाण्याचे खासदार राजन विचारे यांच्या पत्नी व माजी नगरसेविका नंदिनी विचारे यांचा त्या ६६ माजी नगरसेवकांमध्ये समावेश नाही. तसेच त्या व्हायरल झालेल्या छायाचित्रांमध्ये दिसतही नाहीत.

हकालपट्टी झालेले दोन माजी महापौर शिंदे यांनी बंड केल्यानंतर त्यांना उघडपणे पाठींबा दर्शवत, पक्ष विरोधी कारवाया केला.

असा ठपका ठेवत, शिवसेनेतून ठाणे जिल्हाप्रमुख व माजी महापौर नरेश म्हस्के यांची पहिल्यांदा हकालपट्टी झाली. त्याच्या काही दिवसांनी शिवसेना ठाणे जिल्हा संघटक व माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांची पक्षा विरोधात कारवायीचा ठपका ठेवत शिवसेनेतून हकालपट्टी करण्यात आली आहे. त्या एकाच्या नेतृत्वाखाली दुसऱ्या माजी महापौरांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे.

ङ ठाण्याच्या माजी नगरसेविका नंदिनी विचारे फक्त राहिल्या शिवसेनेत

शिवसेनेच्या तिकीटीवरून राजन विचारे हे पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले. ते पुढे ठाण्याचे महापौर ही झाले. त्यानंतर शिवसेनेने त्यांना आमदार आणि खासदार की दिली. सलग दोन वर्षे खासदार म्हणून ते ठाण्यातून लोकसभेत निवडून गेलेले आहेत.

त्यातच त्यांची बुधवारी लोकसभेच्या प्रतोदपदी वर्णी लागली आहे. ठामपामधील एकमेव माजी नगरसेविक नंदिनी विचारे यांनी शिंदे गटात प्रवेश केला नसल्याने, त्या एकट्याच शिवसेनेशी एकनिष्ठ राहिल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याही सलग दोन वेळा ठामपावर निवडून गेल्या आहेत. दरम्यान, त्यांच्याकडे पक्षाने कोणतीही मोठी जबाबदारी दिलेली नव्हती. पण,पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात त्यांचा सहभाग प्रामुख्याने दिसून येत आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा अनोखा विक्रम, चार पिढ्यांनी एकत्र केली पूजा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वडील संभाजी शिंदे, पुत्र श्रीकांत शिंदे आणि नातू रुद्रांश शिंदे उपस्थित

# ठाण्यात वाहतुक कोंडी

**ठाणे:** खड्डे भरण्यास सुरूवात झाल्याने शुक्रवारी सकाळी वाहतुकीचा वेग खूपच मंदावला होता.घोडबंदर रोड असो या मुंबई- नाशिक महामार्ग असो या रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने त्यांचा परिणाम अंतर्गत सेवा रस्त्यावरही दुपारपर्यंत दिसून आला. वाहतुकीचे तीन तेरा वाजल्याने शहरातील सिग्नल यंत्रणा बंद ठेवून वाहतुक पोलीस कर्मचारी चौकाचौकात तैनात केले होते. या कोंडीचा सर्वात जास्त फटका हा शाळकरी विद्यार्थ्यांसह नोकरदार वर्गाला बसला. त्यातच, आपली वाहने घेऊन निघालेल्यांना १० मिनिटांचे अंतर कापण्यासाठी एक तासांचा कालावधी लागल्याने ते हैराण झाले होते.

सलग दोन दिवस पावसाने चांगले झोडपून काढले आहे. त्यातच शहरातील मुख्य रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पाहण्यास मिळून आले. या खड्ड्याने वाहतुकीला चांगलाच ब्रेक लावल्याने ठाणेकर नागरिक त्रस्त झाले आहेत. ठाणेकर वाहतुकीचा सामना करतानाच, शुक्रवारी सकाळी पाऊस नसताना, ठाणेकरांना कोंडी अडकून बसावे लागले. कारण गुरुवारी ब्रयापैकी पावसाने उसंत घेतल्याने पडलेले खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतल्याने मुंबई नाशिक महामार्गासह घोडबंदर रोडवर सकाळी कोंडी झाली होती. या दोन्ही रोडवरील वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सकाळ वाहने तासभर एकाच जागेवर उभे राहल्याचे वाहनचालकांकडून सांगण्यात आले. या कोंडीने अक्षरशः हैराण झाल्याचे व्यथा वाहनचालकांच्या बोलण्यातून स्पष्ट जाणवत होती. या कोंडीचा फटका शहरातील अंतर्गत रस्त्यांवर दिसून आला.

पावसामुळे पडले खड्डे पाऊस थांबल्याचे पाहून ते खड्डे बुजविण्याचे गुरुवारी रात्री हाती घेतल्याने वाहतुक मंदावली होती. तसेच शहरातील सिग्नल यंत्रणा बंद ठेवून पोलीस कर्मचारी चौकाचौकात तैनात करून वाहतुक सुरळीत करण्यासाठी प्रयत्नशील आहोत . - डी कांबळे, उपायुक्त, (प्रभारी) वाहतुक शाखा ,ठाणे

# रस्ता कोणाच्या मालकीचा आहे, त्याची जबाबदारी कोणाची आहे, याची माहिती खड्ड्याच्या ठिकाणी फलकदाद्वारे प्रसिध्द करण्याचा महापालिकेचा निर्णय

**ठाणे** : नेहमीच पावसाळ्यात खड्डे पडल्यावर आपले अंग झटकणाऱ्या इतर प्राधिकरणांना त्यांच्या जबाबदारीची जाण करून देण्यासाठी ठाणे महापालिकेने आता मोठे पाऊले टाकण्यास सुरुवात केली आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने आता ज्या ठिकाणी खड्डे पडतील त्याठिकाणी तो रस्ता कोणाच्या मालकीचा आहे, त्याची जबाबदारी कोणाची आहे, याची माहिती खड्ड्याच्या ठिकाणी फलकदाद्वारे प्रसिध्द करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच त्याठिकाणी संबंधित प्राधिकरणाच्या कार्यकारी अभियंत्याचे नाव त्यांच्या भ्रमणध्वनीसह प्रसिध्द करणार आहे. तसेच एखादी काही दुर्घटना घडल्यास त्याची माहिती त्या त्या ठिकाणच्या स्थानिक पोलीस स्टेशनला मिळावी या उद्देशाने त्या रस्त्याचा नकाशा, खड्ड्यांचे फोटो आणि इतर इंतभूत माहिती पोलीस ठाण्याला आधीच दिली जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पावसाळा सुरु झाल्यावर शहराच्या विविध भागात खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. तसेच याच खड्ड्यांमुळे मागील तीन दिवसापासून शहरात वाहतुक कोंडी देखील होत आहे. परंतु आता शहरातील कोणत्या रस्त्यांवर कोणाच्या मालकीच्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत, याची माहिती पुढे आली आहे. त्यानुसार एमएमआरडीए, एमएसआरीडीसी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग यांच्या मालकीच्या असलेल्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत आणि त्यामुळेच शहराच्या विविध भागात वाहतुक कोंडी झाल्याचे दिसून आले आहे. त्यानुसार कुठे कुठे खड्डे पडले आहेत. याची माहिती देखील आता महापालिकेने पुढे केली आहे. एकूणच खड्ड्यांने आणि शहरात होणऱ्या वाहतुक कोंडीवरुन महापालिकेवर नाहक टिका होत असल्याने या टिकेपासून दूर राहण्यासाठी महापालिका प्रशासनाने नेमकी कोणाची चूक आहे. हे नागरिकांच्या दृष्टीस आणण्याचा हा प्रयत्न केला आहे. असे सूत्रांकडून सांगण्यात आले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३१ जुलै

ठाणे: नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतक्रयांना आर्थिक आधार मिळावा यासाठी कृषि विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम २०२२ करिता या योजनेत सहभागाची अंतिम मुदत येत्या ३१ जुलै २०२२ असल्याचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यात भात पिकाकरीता अधिसूचित ४१ महसूल मंडळांमध्ये तर नाचणी पिकाकरीता अधिसूचित १७ महसूल मंडळांमध्ये ही योजना लागू असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मोहन वाघ यांनी दिली.

ठाणे जिल्ह्याकरिता शासनाकडून युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी नियुक्त करण्यात आली आहे. योजनेत सहभागी शेतक्रयांना हवामानातील प्रतिकुल परिस्थितीमुळे पेरणी न होणे, पिकांचे होणारे नुकसान, पिक पेरणी ते काढणीपर्यंतच्या कालावधीत नैसर्गिक आग, वादळ, चक्रीवादळ, किड व रोग इत्यादी बाबींमुळे उत्पन्नात होणारी घट तसेच पुर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण लाभणार आहे. या योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतक्रयांना ऐच्छिक आहे. सदर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शासनाचे अधिकृत संकेतस्थळ ज्र्स्ि्दन.ग्ह किंवा संबंधित कंपनीचे संकेतस्थळ यावरुनही ऑनलाईन अर्ज करता येईल. पीकासाठी अर्ज सादर करताना बिगर कर्जदार, पिक लागवड नोंदणी प्रमाणपत्र, शेतक्रयांनी सातबारा उतारा, आधार क्रमांक संलग्न बँक खात्याचे तपशील सोबत जोडणे आवश्यक आहे. शेतकरी बांधवांनी शासनाच्या पीक विमा संकेतस्थळावरून, विमा कंपनीच्या संकेतस्थळावरून, नजीकच्या सेतू केंद्रातून वैयक्तिकरित्याही योजनेत सहभागी होऊ शकतात. यंदाच्या खरीप हंगामात भात व नागली लागवड करणऱ्या शेतकरी बांधवांनी योजनेत सहभाग घेतल्यानंतर ई-पीक पाहणी ॲपद्वारे पिक पाहणी नोंद करणे बंधनकारक आहे.

अल्पावधित दिवा शहरात लोकप्रिय ठरलेले वर्तमानपत्र

दिवा न्यूज

दर सोमवारी आपल्या जवळच्या स्टॉलवर उपलब्ध!

# सार्वजनिक बांधकाम, एमएसआरडीसी, एमएमआरडीए, महापालिकांनी त्वरित खड्डे बुजवावेत- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**ठाणे** : नैसर्गिक आपत्तीत जीवित हानी होणार नाही यासाठी यंत्रणांनी समन्वयातून तातडीने मदत व बचावकार्य हाती घ्यावे. जिल्हा प्रशासनातील विभागांनी सतर्क राहून आपत्तीला सामोरे जाण्यासाठी सज्ज रहावे. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम, एमएसआरडीसी, एमएमआरडीए, महापालिकांनी त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी ठाण्यात दिले.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाणे जिल्हा आपत्ती निवारण व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेतली. यावेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव दूरादृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते, तर ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात ठाणे जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक, पोलीस आयुक्त जय जीत सिंह, ठाणे महापालिका आयुक्त विपीन शर्मा, जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे यांच्यासह विविध विभागप्रमुख उपस्थित होते.

अधिकाऱ्यांना क्षेत्रीयस्तारावर काम करण्याच्या सूचना देतानाच अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर काम केल्यास चांगल्याप्रकारे परिस्थितीवर नियंत्रण मिळवता येते, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

**खड्डे कोल्ड मिक्स पद्धतीने भरा**

रस्त्यांवरील खड्डे लक्षपूर्वक भरण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. खड्ड्यांमुळे अपघात होऊन जीवितहानी होऊ नये याची दक्षता घ्या. कोल्ड मिक्स पद्धतीने खड्डे भरा. रस्ते दुरुस्ती करण्ऱ्या यंत्रणांनी काळजी घेण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

जिल्हा प्रशासनाने पूर परिस्थितीवर लक्ष ठेवून त्याभागात जिवीतहानी होऊ नये याची खबरदारी घेतानाच लोकांना सुरक्षित स्थळी हलवावे. त्याठिकाणी नागरिकांना राहण्याची - जेवणाची चांगली व्यवस्था करण्याचे निर्देशही शिंदे यांनी यावेळी दिले. ङवीजपुरवठा सुरळीत राहण्यासाठी दक्षता घ्यावी

वीजपुरवठा अखंडित आणि सुरळीत राहील यासाठी सज्ज रहा. लोकांनी तक्रार निवारण केंद्राला दूरध्वनी केल्यास त्यांना प्रतिसाद मिळेल याची काळजी घ्या. त्यांची तक्रार नोंदवून घेण्याची व्यवस्था करा. क्षेत्रीय कर्मचारी, यंत्रणांना आवश्यक सुविधा, उपकरणे तातडीने पुरवावेत, असे निर्देश त्यांनी ऊर्जा विभागाच्या अधिकऱ्यांना दिले.

**नोडल ऑफिसर नियुक्त करा**

धरणांमधून विसर्ग करताना त्याची पुरेशी पूर्वकल्पना जिल्हा प्रशासनाला द्यावी. रेल्वेच्या यंत्रणांनी सतर्क राहून मुंबई महापालिकेशी समन्वय ठेवावा. पाणी साचून रेल्वे सेवा विस्कळित झाल्यास प्रवाशांना त्रास होऊ नये याची काळजी घ्या. यासाठी एक समन्वयक अधिकारी ( नोडल) नियुक्त करावा. प्रवाशांच्या सुविधेसाठी बेस्ट, एसटी बसेस किंवा स्थानिक परिवहन सेवा यांची मदत घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**मी जनतेचा सेवक**

पावसाचा जोर वाढत असून आपल्या सर्व यंत्रणा सज्ज असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शासन आणि प्रशासन यांनी एकत्रपणे काम केल्यास शासनाविषयी चांगली लोकभावना निर्माण होते. लोकप्रतिनिधी आणि शासन ही दोन्ही चाके समान वेगाने लावल्यास चांगले काम होते. मी राज्याचा जनसेवक म्हणून काम करतो आहे. आपत्कालीन परिस्थितीत लोकांना तातडीने दिलासा मिळाला पाहिजे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

**पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा**

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास, त्यांचे तातडीने पंचनामे करावेत. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी कार्यवाही करण्यात यावी. शासन-प्रशासन आपल्या दारात आले अशी भावना लोकांमध्ये पोहोचायला हवी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

# ठाण्यात कचऱ्यापासून बनणार खत ;१० ठिकाणी उभे राहणार खत निर्मिती प्रकल्प

**ठाणे:** शहरामध्ये नवीन गृहसंकुलांचे विकास प्रकल्प व वाढती लोकसंख्येमुळे भविष्यात घनकचऱ्याची समस्या बिकट बनू शकते, यासाठी या घन कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आता जिथला कचरा - तिथेच निचरा या पद्धतीने घन कचऱ्यावर योग्य ती प्रक्रिया करून ठाणे शहरातील प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रामध्ये प्रत्येकी एक कचऱ्यापासून खत निर्मिती " उभारण्याचा मागणी राज्य सरकारकडून मान्य करत, या कामास निधीसह मंजुरी दिली. ठाणे शहरातील ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीमध्ये १० ठिकाणी खत निर्मिती प्रकल्पासाठी जागा निश्चित झाल्या असून राज्य सरकारकडून या प्रकल्पासाठी पहिल्या टप्यात ५ कोटी निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार प्रताप सरनाईक यांनी शनिवारी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

शहरामध्ये घनकचरा दररोज वाढत असून तो डंपिंग करण्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे. तसेच जेथे कचरा टाकण्यात येतो तेथे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना डेंगू, मलेरिया सारख्या आजारांना सामोरे जावे लागते त्यामुळे नागरिकांचा कचरा प्रकल्पाला विरोध असतो. त्यामुळे कचरा विघटन करून त्यापासून खत निर्मिती करण्याचे प्रकल्प तात्काळ मार्गी लागणे आवश्यक होते व राज्य सरकारकडून निधी मंजूर करून आणल्याने आता छोटे प्रकल्प उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या मोहिमेअंतर्गत 'झाडे लावा झाडे जगवा" ही मोहीम सुरु असून खत निर्मिती प्रकल्प उभारल्यास शहरातील पर्यावरणाच्या दृष्टीने त्याचा फायदा होईल, असेही सरनाईक म्हणाले.

**येथे बनणार खत प्रकल्प !**

ओवळा-माजिवडा मतदारसंघातील ठामपा हद्दीतील लोकमान्यनगर, वर्तकनगर-भिमनगर, शास्त्रीनगर, शिवाईनगर, लक्ष्मी-चिराग नगर, आनंद नगर, ओवळा, मोघरपाडा, कासारवडवली व वाघबीळ या परिसरामध्ये कचऱ्यापासून खत निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. साठी प्रत्येकी ५ कोटी रुपये निधीची आवश्यकता आहे.

**प्रकल्प खर्चाचा ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा**

या कामाला मान्यता मिळाली असून त्याबाबत शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध झाला आहे. 'महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांचा ह्रव्व्हद्ध" या योजनेअंतर्गत राज्य सरकारने पहिल्या टप्यात ५ कोटी निधी 'टोकन' म्हणून महापालिकेला याच आर्थिक वर्षात मंजूर केले असून या प्रकल्प खर्चाचा ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा व २५ टक्के हिस्सा महापालिकेचा राहणार आहे. उर्वरित रक्कम राज्य शासनाकडून पुढील आर्थिक वर्षात दिला जाणार आहे.

शहरात विभागवार, प्रभाग समिती निहाय छोटे छोटे खत निर्मिती प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे. आता नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत असून नव्या मशिनरीमध्ये कोणतीही दुर्गंधी न येता चांगले खत बनते.

स्वछतेची पुरेपूर काळजी घेतली जाते. बंदिस्त वाहनातून वाहून आणलेला ओला व सुका कचरा प्रकल्पात आल्यावर आधी वेगळा केला जातो, मशीन मध्ये टाकला जातो, त्यावर योग्य ती प्रक्रिया करून काही काळाने त्यातून खत निर्मिती होते.

शहरांमध्ये 'शाश्वत कचरा प्रकल्प करणे गरजेचे असल्यामुळे ठाणे शहरात विभागवार असे छोटे छोटे कचरा प्रकल्प पालिकेला सुरु करता यावेत यासाठी राज्य शासनाकडून निधी मंजूर करून आणला असून आता त्यातून हे काम लवकरच सुरु होईल त्यासाठी पालिकेच्या प्रशासनाने आता पुढील कार्यवाही करावी,

**- प्रताप सरनाईक आमदार.**

## पोलीस वसाहतीतील मोडकळीस आलेल्या इमारती कात टाकणार

**ठाणे:** ठाण्यातील पोलीस वसाहतीतील मोडकळीस आलेल्या इमारतींची डागडुजी आणि नवीन इमारतीबाबत आमदार संजय केळकर यांनी राज्य सरकार आणि गृह सचिवांकडे पाठपुरावा सुरू केला असून लवकरच या इमारतींसाठी पुरेसा निधी मिळण्याची शक्यता आहे. या इमारतींमध्ये राहण्यायोग्य घरे उपलब्ध होणार असल्याने शेकडो पोलीस कुटुंबांना दिलासा मिळाला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सेंट्रल मैदान परिसरात असलेल्या पोलीस वसाहतीतील इमारती मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहेत. येथील सहा इमारतींसह ए, बी आणि सी या इमारतींमधील घरे नादुरुस्त असून पोलीस कुटुंबांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. ही घरे खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या असून पर्यायी व्यवस्थाही परिपूर्ण नसल्याचे कळते, त्यामुळे आगीतून फुफाट्यात अशी अवस्था होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# कुपोषण मुक्तीसाठी 'बाळ कोपरा' ; झेडपी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची संकल्पना

**ठाणे :** ग्रामीण भागातील कुपोषणाला आळा घालण्यासाठी शासनाच्या विविध योजनांसह ठाणे जिल्हा परिषद नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असते. त्यातच आता ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भाऊसाहेब दांगडे यांची संकल्पनेनुसार या आर्थिक वर्षात अंगणवाडीतील कुपोषित बालकांसाठी 'बाळ कोपरा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक अंगणवाडीत एक कोपरा तयार करून या कोप्रयात क्षार, जीवनसत्वे व सुक्ष्म पोषक तत्वे असणारे खाद्यपदार्थ ठेवण्यात येणार आहे. हे खाद्यपदार्थ बालक स्वतःच्या हाताने खाऊ शकतील अशी व्यवस्था करण्यात येणार आहे.

ठाणे जिल्हा परिषदेचा महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारीत ग्रामीण व आदिवासी भागामधील ०९ प्रकल्पातंर्गत एकुण १, ९८४ केंद्रामध्ये ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील १,३१,३०७ मुले योजनेचा लाभ घेतात. विभागातंर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके व गरोदर स्तनदा माता यांना घरी नेऊन खाण्यायोग्य आहारदेण्यात येते. तसेच ३ ते ६ वर्षे वयोगटातील अंगणवाडीतील बालकांना अंगणवाडीमध्ये गरम ताजा आहार देण्यात येतो. अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला व बाल विकास विभागाने दिली.

केंद्र शासनाच्या धोरणाला पूरक

केंद्र शासनाचे राष्ट्रीय पोषण मंडळाच्या अहवालानुसार वयोगटाप्रमाणे क्षार, जीवनसत्वे व सुक्ष्म पोषक तत्वे आहारातुन मिळणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना नियमित आहारा व्यतिरिक्त अतिरिक्त आहार उपलब्ध करून दिल्यास त्यांना योग्य ती प्रथिने व उष्मांक मिळून त्यांचे कुपोषण दुर होण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामध्ये अंगणवाडीमध्ये बालकांना नाचणीयुक्त बिस्कीट, राजगिरा स्लाईस, बिस्किट, खोबरा मिक्स वडी आदि अतिरिक्त आहार देण्याचे प्रस्तावित आहे.

बाळ कोपरा ही संकल्पनेमुळे ठाणे जिल्हयातील कुपोषण कमी होईल. बालकांसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. या उपक्रमामुळे बालकांची रोगप्रतिकार शक्ती वाढवणारे, शरिरातील सर्व धातुस पुष्टी देणारे, हाडे व मांस पेशी यांना बळकटी देणारे, शारिरिक बौध्दीक क्षमता वाढविणारे, वजन वाढविणारे,रक्त शुध्द व वृध्दी करणारे,पचन करणारे पौष्टिक प्रोटीनयुक्त असलेले पोषक आहार मिळल्याने बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

- **डॉ. भाऊसाहेब दांगडे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झेडपी, ठाणे

## ठाण्यात अकरा लाखांच्या गांज्यासह एकाला अटक

ठाणे : टेम्पोमधून तब्बल ११० किलो गांजा घेऊन निघालेला चालक अंबलाल जगदीश जाट याला ठाणे शहर पोलीस दलाच्या वागळे इस्टेट गुन्हे शाखेने अटक केली. तसेच त्याच्याकडून ११ लाखांचा गांजा जप्त केला असून टेम्पोसह एकूण १६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच त्या चालकाला पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली.

कापूरबावडी नाका येथून ठाण्यात गांजा अमली पदार्थ घेऊन एक टेम्पो येणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे शाखा वागळे युनिटचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने गुरुवारी रात्री ९.१० वाजेच्या सुमारास कापूरबावडी येथील भिवंडीकडून ठाण्याकडे येण्ऱ्या रस्त्यावरील अग्निशमन दलाच्या कार्यालयाजवळ सापळा लावला. यावेळी संशयित टेम्पोला घेराव घालून पोलिसांनी त्यास अडवले आणि त्याची तपासणी केली असता त्यात ११ गोण्यात गांजा लपवून ठेवल्याचे दिसून आले. पोलिसांनी गांजा व टेम्पो जप्त केला. यावेळी टेम्पो मध्ये तब्बल ११० किलो गांजा मिळून आला. या गांजाची किंमत ११ लाख रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी संगीतले. गांजा व टेम्पोसह पोलिसांनी १६ लाखाचा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे. तर टेम्पो चालकविरोधात कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास वागळे युनीट करत आहे.

## ठाण्यात इमारतीच्या गॅलरीचा भाग पडला

**ठाणे:** राबोडीत इमारतीच्या गॅलरीचा भाग पडल्याची घटना ताजी असतानाच, गुरुवारी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास कळवा, राजछाया इमारती समोरील आशिर्वाद या इमारतीच्या गॅलरीचा भाग पडला. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. त्या इमारतीमध्ये कोणी राहत नसुन, जवळ असलेली आशिर्वाद इमारत/ मध्ये राहणाऱ्या तिन्ही कुटुंबांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आले.

हवामान खात्याने अतिवृष्टी ची शक्यता वर्तवल्याने सध्या पावसाने दमदार हजेरी लावली आहे. यामुळे शासकीय यंत्रणांची धावपळ होता दिसत आहे. त्यातच गुरुवारी दुपारी कळव्याच्या, जुना जुना मुंबई-पुणे रोड असलेली तळ अधिक मजली आशिर्वाद 'अ 'या इमारतीच्या गॅलरीचा भाग पडला. अशी माहिती मिळताच घटनास्थळी उप-आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन कक्ष), सहाय्यक आयुक्त (कळवा प्रभाग समिती), उप-अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग), आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचाऱ्यांसह ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, टोरेंट कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान १-रेस्क्यू वाहनासह दाखल झाले. सुदैवाने त्या इमारतीमध्ये कोणी राहत नसल्याने कोणालाही दुखापत झालेली नाही. तसेच, त्या इमारतीच्या जवळ असलेली तळ अधिक दोन मजली आशिर्वाद 'बी' या इमारतीमध्ये राहणाऱ्या तिन्ही कुटुंबांना आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान यांच्या मदतीने पहिल्यांदा सुखरुप बाहेर काढण्यात आले.

## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ११ ते १७ ऑगस्ट दरम्यान 'हर घर तिरंगा' अभियान

**ठाणे :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य सरकारच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत ११ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान शहरात राबविण्यात येणार आहे. याबाबत शासनाच्यावतीने मार्गदर्शक सुचना प्राप्त झाल्या असून गुरुवारी महापालिका आयुक्त डॉ. विपिन शर्मा यांनी महापालिकेच्या सर्व विभागप्रमुखांसमवेत आढावा घेतला

महापालिका भवन येथे ''हर घर तिरंगा'' अभियानांतर्गत आयोजित बैठकीस अतिरिक्त आयुक्त(२) संजय हेरवाडे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी पालिका आयुक्त म्हणाले की, शासन निर्णयानुसार स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतीकारक यांच्या आठवणी तसेच देशभक्तीची भावना जनमानसात कायम राहावी उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

स्वातंत्र्याच्या महोत्सवानिमित 'हर घर झेंडा' अमृत अभियानांतर्गत शहरात जास्तीत जास्त ध्वज लावण्याचे नियोजन आहे. ११ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत खाजगी आस्थापना, सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या इमारतीवर तर नागरिकांना स्वतःच्या घरावर स्वयंस्फुर्तीने ध्वज संहितेचे पालन करून राष्ट्रध्वज उभारावेत यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याच्या सूचना महापालिका आयुक्तांनी दिल्या.

यामध्ये हुतात्मा स्मारकांचे सुशोभिकरण करणे, स्वातंत्र्यदिनी प्रभात फेरीचे आयोजन करणे, एन.सी.सी.,एन.एस.एस.कॅडेटचे संचलन करणे, सायक्लोथॉन / मॅरेथॉनचे आयोजन करणे, शालेय, महाविद्यालय स्तरावर निबंध, वक्तृत्व, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करणे, स्वातंत्र्य चळवळीशी निगडीत चित्रांचे प्रदर्शन भरविणे तसेच आजादी का अमृत महोत्सवाचा लोगो सर्व शासकीय इमारतीवर लावणे आदी उपक्रम राबविण्याच्या सूचना त्यांनी संबधितांना दिल्या. ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवा निमित्त प्रत्येक नागरिकाने आजादी का अमृत महोत्सव आणि हर घर तिरंगा या उपक्रमात सहभागी होण्यासाठी आवश्यक ती मदत करावी,असे करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. शर्मा यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिले. या उपक्रमानिमित्त कार्यशाळा, चर्चासत्रे, विविध स्पर्धा, जाणीव जागृती तसेच सांस्कृतिक कार्यक्रम ११ ते १७ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत स्वराज्य महोत्सवानिमित्त शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबधितांना दिल्या.

## ठाणे जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक यांनी घेतला आपत्ती निवारणाचा आढावा

ठाणे: ठाणे जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक यांनी बुधवारी ठाणे येथे भेट देवून जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेतली. जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी वैदेही रानडे, निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील जाधव यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास जिल्हा यंत्रणेने सतर्क राहून नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यासाठी विविध विभागांशी समन्वय राखला पाहिजे. जिल्ह्यातील आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक तो औषध साठा उपलब्ध करून घ्यावा. आपत्ती निवारणासाठी आवश्यक असणारी साधनसामुग्री गाव, तालुकास्तरापर्यंत पोहोचवावी, अशा सूचना यावेळी सौनिक यांनी दिल्या. ठाणे जिल्ह्याला यंदा एनडीआरएफच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर सुमारे ७६ बोटी देखील यंत्रणेकडे आहे. नैसर्गीक आपत्ती उद्भवल्यास यासर्व यंत्रणांच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्याचे काम करण्याचे आवाहन सौनिक यांनी केले.

# अडकलेल्या २ वर्षीय चिमुकलीची सुखरूप सुटका ; अग्निशमन दलाची कामगिरी

**ठाणे:** घोडबंदर रोड,ओवळा येथील अटलांटिक टॉवरच्या अकराव्या मजल्यावरील खोली क्रमांक-११०३ मधील खोलीतील बेडरूममध्ये अडकलेल्या दोन वर्षीय चिमुकलीला माहिती मिळाल्यानंतर काही मिनिटांत सुखरूप बाहेर काढण्यात ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले.

ही घटना शुक्रवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास समोर आली. बेडरूमच्या दरवाजाचे लॅश लॉकमध्ये बिघाड होऊन दरवाजा लॉक झाल्याने दोन वर्षीय मेहेर मिश्रा ही चिमुकली अडकल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

ओवळा येथील अटलांटिक टॉवरच्या अकराव्या मजल्यावरील बेडरूम चिमुकली अडकली असल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान १-रेस्क्यु वाहन व १-फायर वाहनासह दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी त्या खोलीच्या दरवाजाचे लॅश लॉक डोअर ब्रेकरच्या सहाय्याने तोडून त्या चिमुरडीला सुखरूप सुटका केल्यावर त्या मायलेकींची भेट झाली. ही खोली प्रियांका मिश्रा यांच्या मालकीची आहे.असे आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितले.

प्रगती बेरोजगार सेवा सहकारी सोसायटी (मर्या.)
उपरोक्त संस्थेमार्फत नामांकित कंपनीमध्ये खाली दिलेल्या रिक्त पदांसाठी त्वरित पात्र उमेदवार पाहिजेत.
➡ टेलिकॉलिंग ➡ कॉल सेंटर
➡ मॅकेनिक ➡ सेल्स मार्केटिंग
➡ फार्मासिस्ट ➡ अकाऊंटन्ट
➡ टेक्निशियन ➡ बॅक ऑफिस
➡ कार मॅकेनिकल
-:अधिक माहितीसाठी संपर्क:-
आकाश गायकवाड ✆ ८२८६९७८४००

आपल्या उत्पादनाची/ संस्थेच्या योजनांची जाहिरात करण्यासाठी दिवा शहरातील हक्काचे माध्यम..!
दिवा न्यूज
संपर्क:-९९८७५१२००१

LIC
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

बाबूजी मल्टिसर्व्हिसेस
कामे तुमची साथ आमची!
• इन्शुरन्स (सुविधा/विमा सल्लागार) आयटीआर • जीएसटी सर्व्हिसेस
• बिझनेस सपोर्ट सर्व्हिसेस • प्लेसमेंट • लीगल सर्व्हिसेस • योग आणि आयुर्वेदिक उपचार
प्रोप्रा. बाबुराव खेडेकर
सदैव आपल्या सेवेत!
संपर्क : 9702442024 / 9967721950
Facebook / Youtube Channel - सत्याग्रह
ब्लॉग - http://creativemaratha.blogspot.com

जय भवानी
आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स
स्क्रिन व ऑफसेट प्रिंटिंग
डि. टी. पी. ( मराठी / इंग्रजी / हिंदी )
व्हिजिटिंग कार्ड | फलेक्स / बॅनर
बिल बुक | चलन बुक
लेटर हेड | आय कार्ड
टि-शर्ट प्रिंटिंग | स्टिकर
लग्न पत्रिका | निमंत्रण पत्रिका
येथे सर्व प्रकारचे प्रिंटींग करुन मिळेल.
आमच्याकडे म्युच्युअल फंड, हेल्थ इंन्शुरन्स (मेडिक्लेम), टर्म इंन्शुरन्स तसेच सर्व प्रकारचे इंन्शुरन्स काढुन मिळेल.
पत्ता:- ०६, जिवदानी अपार्टमेंट, मुंब्रादेवी कॉलनी रोड, गुरुदर्शन नगर, वारेकर शाळेजवळ, दिवा (पूर्व) ठाणे - ४०० ६१२.
संपर्क :- मंगेश सकपाळ ✆ ७०२१९४२१२३, ९९८७५१२००१
Email id : jaybhawaniarts@gmail.com

दिवा रत्न पुरस्कार भेटलेले डॉ. महाजन यांचे सुसज्ज हॉस्पिटल
एस हॉस्पीटल (मल्टीस्पेशालिटी) आणि रिसर्च सेंटर
(ISO) 9001:2015
कोरोनामध्ये सामान्य माणसाला आधार !
आम्ही देत आहोत परवडणाऱ्या दरामध्ये दिवा वासियांना आरोग्य सुविधा
हृदयविकार, पॅरालीस, ॲक्सीडेंट व इ. व्हेंटीलेटर, बायपॅपसह
➤ जनरल वॉर्ड फक्त 999/- प्रती दिवस
➤ ICU अतिदक्षता विभाग फक्त 2999/- प्रती दिवस
(हॉस्पिटलचे डॉक्टर, नर्सेस, बेड चार्जेस)*
स्त्री रोग, अल्पदरात प्रसुती, लहान मुलांचे आजार, मुत खडा, लेझर (दुर्बीनद्वारे) शस्त्रक्रिया, हायरिस्क प्रसुती

*आपल्या कुटूंबाचा मेडिक्लेम फक्त 20/- मध्ये प्रति दिवस
*मोफत नर्सिंग कोर्सेस (सरकार मान्यता प्राप्त)
संतोष कॉम्प्लेक्स, बी-विंग, पहिला मजला, दिवा-आगासन रोड, मयुर हॉटेल जवळ, दिवा (पूर्व) ठाणे
9322336970 | 9833804555 | 9022391879

# दिवा भाजपच्या वतीने आयोजित मोफत दाखले वाटप शिबिराचे आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते उदघाटन

दिवा:-भारतीय जनता पार्टी, सेव्ह दिवा फाऊंडेशन व तशीलदार ठाणे यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या मोफत दाखले वाटप शिबिराचे उदघाटन जिल्हाध्यक्ष व आमदार निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या उपक्रमाला ठाणे तहसीलदार कार्यालय यांचे सहकार्य लाभले. दिवा भाजपच्या वतीने शहरातील नागरिकांना विविध शासकीय दाखले एकाच छताखाली उपलब्ध व्हावेत यासाठी सिद्धांत पार्क येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी भाजपचे माजी नगरसेवक संजय वाघुले,जिल्हा संघटक सरचिटणीस विलास साठे जिल्हा उपाध्यक्ष नरेश पवार ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत कार्यकारणी सदस्य अशोक पाटील गणेश भगत विजय भोईर दिवा शहर मंडल अध्यक्ष रोहिदास मुंडे संघटक सरचिटणीस दिलीप भोईर सरचिटणीस समीर चव्हाण युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर महिला मोर्चा अध्यक्ष ज्योती पाटील ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत, राजकांत पाटील,उत्तर भारतीय मोर्चाचे अजय सिंग ,व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर, श्रीधर पाटील,सीमा भगत,सपना भगत, राहुल साहू,समशेर यादव, अमरनाथ गुप्ता, अवधराज राजभर ,सुमित मिश्रा, शिल्पा लाड ,आकाश भोईर ,प्रणव भोईर ,विपिन भोईर ,गौरव पाटील ,साईनाथ भोईर ,नयन भगत ,आदित्य म्हात्रे, विशाल पाटील, मृणाल भगत, शैलेश कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.




# नवीमुंबईतील युवकाचा ठाण्यात बुडून मृत्यू; कळव्यातील कारगिल डोंगरावरील घटना

**ठाणे:** कळवा, पारसिक हिल,येथील कारगिल डोंगरावरील विहिरीमध्ये पोहताना नवीमुंबई दिघा येथील सुमित मनोज माळी या १७ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू झाला. सुमारे ७०० ते ८०० मीटर उंची असलेल्या डोंगरावरती असलेल्या विहीरिमध्ये तो आपल्या सहा मित्रांसोबत शुक्रवारी पोहण्यासाठी गेला होता. शनिवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह अंदाजे ३० ते ३५ फुट खोल असलेल्या विहीरीतून बाहेर काढण्यात आले, विहिरीच्या खोलीचा आणि पाण्याचा अंदाज न असल्याने तो बुडाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे अशी आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

कळवा पूर्व येथील कारगिल डोंगरावरील विहिरीत एक जण बुडल्याची माहिती शुक्रवारी सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास ठाणे महापालिका प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षेत आलेल्या दूरध्वनीवर देण्यात आली.तातडीने घटनास्थळी कळवा पोलीस कर्मचारी, सहाय्यक आयुक्त (कळवा प्रभाग समिती), प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी व कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षातील स्विमर्स, तसेच ठाणे अग्निशमन दलाचे जवान १-रेस्क्यू वाहनासह दाखल झाले. पण , हा प्रकार सुमारे ७०० ते ८०० मीटर उंची असलेल्या डोंगरावरती असलेल्या विहीरीत घडला होता. त्यातच जाण्यासाठी अरुंद रस्ता असल्यामुळे व रात्रीच्या अपुऱ्या प्रकाशामुळे त्या ठिकाणी पोहचणे अशक्य होते. तसेच कळवा पोलिस कर्मचारी व कुटुंबीयांच्या परवानगीने शोधकार्य थांबविण्यात आले होते. तर शनिवारी सकाळी ०७:३० वाजल्यापासून त्या ठिकाणी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात आले. सुमारे ३- तासांच्या प्रयत्नानंतर सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास त्या युवकाचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढण्यात आला.

तसेच मृतदेह डोंगरावरून खाली आणायला सुमारे ५०-मिनिटाचा कालावधी लागला.त्यानंतर, तो मृतदेह कळवा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

सुमित माळी हा आपल्या ६-मित्रांसोबत विहिरीमध्ये पोहण्याकरिता गेला होता. विहिर ही अंदाजे ३० ते ३५ फुट खोल असू विहीरीचा खोलीचा व पाण्याचा अंदाज न आल्यामुळे सुमित विहिरीमध्ये बुडाला असल्याची शक्यता वर्तविण्या येत आहे. असे आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगण्यात आले.

## तीन दुचाकींना आग

ठाणे : मुंब्रा,शैलेश नगर येथील इमारत क्रमांक-२० जवळ उभ्या केलेल्या तीन दुचाकींना आग लागल्याची घटना शनिवारी सकाळी पावणेनऊ वाजण्याच्या सुमारास घडली. त्या दुचाकींचे नुकसान झालेले असून या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळविले.तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नाही. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

## महापालिका शाळेच्या वर्गात आग

ठाणे: कोकणी पाडा,पोखरण रोड क्रमांक-२,येथील ठाणे महापालिकेच्या शाळा क्रमांक-४८ मध्ये असलेल्या एका वर्गामधील महावितरणच्या स्विच बोर्डला आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घडली. यावेळी शाळेतील शिक्षकांच्या मदतीने व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचार्यांच्या मदतीने त्या शाळेतील २२ विद्यार्थ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

कोकणी पाडा, पोखरण रोड क्रमांक-२ येथील शिवसेना शाखेच्या बाजूला ठामपा शाळा क्रमांक ४८ ही प्राथमिक शाळा असून ते पहिले ते सातवीचे वर्ग भरतात. या शाळेच्या एका वर्गामधील महावितरणच्या स्विच बोर्डला शॉर्टसर्किट होऊन आग लागली. अशी माहिती मिळताच, घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, महावितरणचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, तातडीने आगीवर नियंत्रण मिळवून त्या शाळेतील तब्बल २२ विद्यार्थ्यांना सुखरूप बाहेर काढून जवळच असलेल्या शिवसेना शाखा, येथे सुरक्षित ठिकाणी नेले. या घटनेत कोणालाही दुखापत झालेली नसून परिस्थिती नियंत्रणात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.

दिवा न्यूज
दर सोमवारी वाचकांच्या भेटीला...सोमवार ते रविवार स्टॉलवर उपलब्ध असणारे वर्तमानपत्र!